महा मेट्रो

NAGPUR METRO

# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प)

## भारतातले सगळ्यात मोठे डबल डेकर गर्डर गड्डीगोदाम येथे

## बुटीबोरी येथे झाले पुलाचे निर्माण व फेब्रिकेशन कार्य



नागपूर 18 : महा मेट्रोने निर्माण कार्याच्या सुरुवातीपासूनच अनोखे निर्माण कार्य करत शहराच्या विकासात भर घातला असून ज्यामध्ये वर्धा मार्गावर डबल डेकर उड्डाणपुल, आनंद टॉकीज येथे निर्माण केलेले बॅलन्स कॅंटीलीव्हर, सिताबर्डी येथे गर्दीच्या ठिकाणी उभारललेले इंटरचेंज मेट्रो स्टेशन व झिरो माईल फ्रीडम पार्क मेट्रो स्टेशन या ठिकाणी आधुनिक असे निर्माण कार्य करत शहराला एक नवी ओळख प्रदान केली आहे या मध्ये आणखी भर घालत कामठी मार्गावर गड्डीगोदाम, गुरुद्वारा या ठिकाणी चार मजली पूल तयार करीत असून त्यासाठी

विशालकाय लोखंडी स्ट्रकचर तयार करण्यात आला असून लवकरच गुरुद्वारा या ठिकाणी सदर लोखंडी स्ट्रकचर बसविण्याचे कार्य सुरु होणार आहे. मुख्य म्हणचे सदर लोखंडी स्ट्रकचर बुटीबोरी एमआयडीसी या ठिकाणी तयार करण्यात आले असून आता सडक मार्गाने बुटीबोरी येथून गड्डीगोदाम या ठिकाणी ट्रेलरच्या साहाय्याने आणल्या जात आहे.



सदर स्ट्रकचर प्रथमतः बुटीबोरी येथे उभारण्यात आले असून या ठिकाणचे कार्य पूर्ण झाल्यानंतर या स्ट्रकचरला डिसमेंटल करून रस्त्याने गड्डीगोदाम येथे आणल्या जात आहे. लोखंडी स्ट्रकचर बुटीबोरी येथे उभारतांना २५० टन क्षमतेच्या २ क्रेनचा उपयोग करण्यात आला गड्डीगोदाम येथे उभारणी करतांना ५०० टन क्षमतेच्या २ क्रेनचा उपयोग करण्यात येणार आहे.

या ठिकाणी देशात पहिल्यांदाच वेगळ्या पद्धतीची संरचना असलेल्या चार स्तरीय बांधकाम केल्या जात आहे. सदर निर्माण कार्य अतिशय कठीण आणि मुख्य म्हणजे सतत व्यस्त अश्या रेल्वे लाईन गड्डीगोदाम येथील आरयुबी(RuB) येथे करण्यात येत आहे.  गड्डीगोदाम क्रॉसिंग येथील संरचनेत ४ स्तरीय परिवहन व्यवस्था आहे. पहिल्या स्तरावर जमिनी मार्ग (विद्यमान आरयुबी मार्ग) रहदारी करीता असलेला रस्ता, दुसऱ्या स्तरावर रेल्वे ट्रॅक, तिसऱ्या आणि चौथ्या स्तरावर उड्डानपूल आणि मेट्रो मार्गिका राहणार आहे .

**या लोखंडी स्ट्रकचरचे प्रमुख वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे** :

· स्ट्रकचरची जमिनीपासून उंची २४ मीटर,लांबी ८० मीटर व रुंदी १८ मीटर आहे.

· एकूण वजन १ हजार ६३४ टन

· १५४ कर्मचाऱ्यानी पुलाचे प्रत्येक सुटे भाग तयार केले

· स्ट्रकचर उभारणी करतांना सुमारे ७८००० एएसएफजी (हाईट स्ट्रेंथ फ्रिक्शन ग्रीप) बोल्टचा उपयोग करण्यात आला.






प्रस्तावित उड्डानपूल आणि मेट्रो ट्रॅकज्याला 'राईट ऑफ वे' म्हणतात. म्हणजे या २ संरचनेचे निर्माण कार्य एका सिंगल पिलर वर होणार आहे. ज्यामुळे किंमत आणि रस्त्यावरील जागेचा कमी उपयोग होईल. उड्डानपूल संरचना एलआयसी चौक येथून सुरु होणार असून आटोमोटीव्ह चौक पर्यत कामठी रोड अश्या व्यस्त मार्गावर आहे.मेट्रो व्हायाडक्टची सर्वात जास्त उंची गड्डी गोदाम येथील गुरुद्वारा जवळ असले ज्याठिकाणी रेल्वेमार्ग रस्त्यावरून जात आहे.